**"वेतकाम" दरनिश्चिती बाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय,**

**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**

**आदेश क्रमांक. उसं/भांखस/वेतकाम/दरनिश्चिती/२०२२-२३/(१२)/२०२२/ सी 11838**

**दिनांक - 18 NOV 2022**

**वाचा :-१) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस -२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग -४, दि.०१/१२/२०१६**

**२) मध्यवर्ती भांडार खरेदी समितीची बैठक दि.१९/०९/२०२२ रोजीचे इतिवृत्त.**

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.१५ नुसार परिशिष्ट-१८ मध्ये अंध व अपंग संस्थानी उत्पादीत केलेल्या वस्तूंना आरक्षण देण्यात आले आहे. सदर संस्थांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंची दरनिश्चिती मध्यवर्ती भांडार खरेदी समिती मार्फत करण्यात येते. त्यानुसार **"वेतकाम"** या बाबीची **सन २०२२-२३** या वर्षासाठी दरनिश्चिती करण्यासाठी खालील संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने दि.२९/०९/२०२२ रोजीच्या बैठकीत **"वेतकाम"** या बाबीचे निश्चित केलेले दर परिशिष्ट-"अ" येथील तक्त्यामध्ये दर्शविल्या प्रमाणे आहेत. सदर दर हे खालील संस्थांसाठी निश्चित करण्यात आले आहेत.

१) मे. दिपक इंडस्ट्रियल को-ऑप. सोसायटी लि., चेंबूर मुंबई.
२) मे. दि. नेशनल सोसायटी फॉर द वेल्फेअर ऑफ द फिजिकल हॅन्डीकॅप्ड, ठाणे.
३) मे. महाराष्ट्र अंध औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, बांद्रा, मुंबई.
४) मे. ब्लाईंड मेन्स इंडस्ट्रीयल को-ऑ. प्रोडयुसर्स सोसायटी लि. विक्रोळी (पश्चिम), मुंबई.

**"वेतकाम"** याबाबीचे दर खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | दरनिश्चिती बाबीचे नाव | उत्पादित बाबीचे विनिर्देश | सन २०२२-२३ करीता निश्चित केलेले दर (रूपये) |
|---|---|---|---|
| | | केन साईज जाडी x रुदी | |
| १. | वेतकाम | ०.५ एम.एम. X २.०० एम.एम. | ६०.०० प्रती १००० चौ. से.मी. |

सदर दरनिश्चितीची **विधिग्राह्यता दि.३०.०४.२०२३** पर्यंत किंवा पुढील वर्षाचे दरनिश्चिती आदेश निर्गमित होईपर्यंत यापैकी जी कार्यवाही नंतर होईल तो पर्यंत ग्राह्य राहतील. वेतकाम या बाबी साठी जर वस्तू व सेवाकर (GST) लागू असेल, तर या बाबींकरीता GST हा वर नमूद केलेल्या दरावर अतिरिक्त राहील. सदर दर खरेदीदाराच्या कार्यालयापर्यंत मोफत पोहोच असे आहे.

अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्था यांनी संस्थेच्या अंध व अपंग सभासद व्यक्तीकडूनच शासकीय

कार्यालयानी दिलेले कामे पुर्ण करुन घ्यावेत.

**पुरवठा कालावधी :-** मागणीपत्र मिळाल्यापासून ०६ आठवड्याच्या आत वेतकामाची कामे पूर्ण करणे आवश्यक राहील.

**देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकार कार्यालयाने वेतकाम पुर्ण झाल्यावर कामाचे त्वरीत निरीक्षण करावे. निरीक्षणात वेतकामामध्ये आढळलेल्या उणीवा/ त्रुटी/ दोष ताबडतोब पुरवठादारांच्या व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या / खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही वेतकाम झालेल्या तारखे पासून १५ दिवसात करण्यात यावी. मालाचा निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर व तपासणी केल्यानंतर ९०% रक्कम ०२ आठवडयामध्ये संस्थाना द्यावी व उर्वरित १०% रक्कम सर्व कामे पुरवठा आदेशानुसार सुस्थितीत व विनिर्देशांप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत करणे आवश्यक राहील. पुरवठा कालावधी मध्ये वेतकामाची कामे पुर्ण न झाल्यास उशीरा वेतकाम केलेल्या कामांच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवड्या प्रमाणे दंड मागणीकारामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालील प्रमाणे असेल.

अ) विहीत कार्य कालावधी मध्ये पुर्ण न केलेल्या कामाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतींच्या १०% दंड आकारला जाईल.

ब) विहीत कार्य कालावधी मध्ये पुर्ण न केलेल्या मालाची किंमत दोन लाखा पेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड आकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकार कार्यालयाची असेल. वेतकाम गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने करावी.

वरील संस्थांनी शासकीय कार्यालयात केलेल्या वेतकामाचा अहवाल दरमहा मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

सदरचे आदेश मा. विकास आयुक्त (उद्योग) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

(वि.मु.सिरसाठ)
**उद्योग सह संचालक (भां.ख.)**

**प्रति,**

१) मे. दिपक इंडस्ट्रियल को-ऑप. सोसायटी लि., दुकान नं. ५४, वत्सलाताई नाईक नगर, श्री.राजेश्वर मेडिकल समोर, स.गो.बर्वेमार्ग, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.

२) मे.दि. नेशनल सोसायटी फॉर द वेल्फेअर ऑफ द फिजिकल हॅन्डीकॅप्ड, बीबी-१२,राजदर्शन दादा पाटीलवाडी, प्लॅटफॉर्म क्र.१ जवळ ठाणे(पश्चिम)-४०० ६०२

३) मे. महाराष्ट्र अंध औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, २/बी/४०८, इंदीरा गांधी गृह निर्माण रहिवासी संघ, प्रो. अनंत काणेकर मार्ग, प्रकाशगड जवळ, बांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

४) मे.ब्लाईंड मेन्स इंडस्ट्रीयल को-ऑ. प्रोडयुसर्स सोसायटी लि. १, चव्हाण भवन कम्पाऊंड, स्टेशन रोड, विक्रोळी (पश्चिम), मुंबई ४०० ०८३.

५) निवडनस्ती.